आकाशवाणी नागपूर

प्रादेशिक वृत्त विभाग

प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)

सोमवार दिनांक २६ जानेवारी २०२६

ठळक बातम्या

- ७७ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त नवी दिल्लीच्या कर्तव्यपथावर देशाच्या सामरिक सामर्थ्याचं आणि सांस्कृतिक वारशाचं समृद्ध दर्शन.
- राज्यासह विदर्भात सर्वत्र प्रजासत्ताक दिनानिमित्त ध्वजवंदन संपन्न.
- नागपूर जिल्हयात सर्वच क्षेत्रात विविध विकासकामं सुरू - पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचं प्रजासत्ताक दिनाच्या भाषणात प्रतिपादन.
- ई-गव्हर्नन्स सुधारणा उपक्रमाअंतर्गत नऊ सरकारी कार्यालयांची उत्कृष्ट कामगिरी, नागपूर विभागीय आयुक्त कार्यालयाचा समावेश.

प्रजासत्ताक दिन-मुख्य सोहळा

देशाचा ७७वा प्रजासत्ताक दिन आज सर्वत्र साजरा होत आहे. नवी दिल्लीच्या कर्तव्यपथावर राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या उपस्थितीत सेनादलं, निमलष्करी दलं तसंच सांस्कृतिक पथकांच्या शानदार संचलनाने मानवंदना दिली. स्वातंत्र्याचा मंत्र वंदे मातरम आणि समृद्धीचा मंत्र आत्मनिर्भर भारत या संकल्पनेवर आधारित शानदार संचलन सोहळा आज नवी दिल्लीच्या कर्तव्यपथावर संपन्न झाला. युरोपियन कौन्सिलचे अध्यक्ष अँटोनियो कोस्टा आणि युरोपियन कमिशनच्या अध्यक्ष उर्सुला फॉन डेर लेयन प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होत्या. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, संरक्षण मंत्री राजनाथ सिंग, इतर केंद्रीय मंत्री संरक्षण दलांचे प्रमुख तिन्ही सेनादलांचे प्रमुख आणि इतर वरिष्ठ अधिकारी, लोकप्रतिनिधी, या सोहळ्यासाठी देशभरातून आमंत्रित केलेले विशेष पाहुणे आणि हजारोंच्या संख्येने जनसमुदाय हा नेत्रदीपक सोहळा पाहण्यासाठी उपस्थित होते. ऑपरेशन सिंदूरचं प्रारूप दाखवणारा लष्कराचा चित्ररथ, ब्राहमोस आणि एस फोर हंड्रेड क्षेपणास्त्र, अर्जुन रणगाडा, १६ लढाऊ विमानं, आणि भारताच्या सामरिक सामर्थ्याचं दर्शन घडवणारी शस्त्रास्त्रं हे संचलनाचं प्रमुख आकर्षण होतं. बॅटल अॅरे पद्धतीने म्हणजे प्रत्यक्ष युद्धभूमीवरची व्यूहरचना दाखवणारं संचलन प्रथमच प्रजासत्ताकदिनी पहायला मिळालं. अनेक पथकांचं नेतृत्व महिला अधिकाऱ्यांनी

केलं. विविध राज्य आणि केंद्रसरकारी विभागांचे मिळून ३० चित्ररथ आपापल्या कामगिरीचं दर्शन घडवणारी दृष्यं धारण करुन मानवंदना देत होते. गणेशोत्सव या संकल्पनेवर आधारित महाराष्ट्राचा चित्ररथ लक्षवेधी ठरला. मुख्य सोहळ्यापूर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी वीरजवान स्मारकावर पुष्पचक्र अर्पण करुन देशासाठी प्राणांचं बलिदान देणाऱ्या शहीदांना आदरांजली वाहिली.

आंतरराष्ट्रीय/शुभांशू शुक्ला

आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकाला भेट देणारे पहिले भारतीय, ग्रुप कॅप्टन शुभांशू शुक्ला यांना आज राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी अशोक चक्र हा शांततेच्या काळातला देशाचा सर्वोच्च शौर्य पुरस्कार प्रदान केला. ७७व्या प्रजासत्ताक दिनी कर्तव्यपथावर झालेल्या भव्य सोहळ्यात हा कार्यक्रम झाला. गेल्या वर्षीच्या जून महिन्यात ॲक्झिओम-४ या मोहिमेअंतर्गत शुभांशू शुक्ला हे अंतराळात जाणारे दुसरे, तर अंतराळ स्थानकावर पाय ठेवणारे पहिलेच भारतीय ठरले होते.

ध्वजारोहण जागतिक

बांगलादेशाची राजधानी ढाका इथं भारतीय उच्चायुक्तालयात प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा झाला. यात भारतीय समुदायाचे लोक मोठ्या संख्येनं सहभागी झाले. श्रीलंकेत कोलंबो मधल्या इंडिया हाऊसमधे भारताचे उच्चायुक्त संतोष झा यांच्या हस्ते ध्वजारोहण झालं. यावेळी स्वामी विवेकानंद सांस्कृतिक केंद्राच्या विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रमाचं सादरीकरण केलं. सिंगापूरमध्ये भारताचे उच्चायुक्त डॉक्टर शिल्पक अंबुले यांच्या हस्ते उच्चायुक्तालयात ध्वजारोहण झालं. कार्यक्रमाला भारतीय समुदायाचे हजारो नागरिक उपस्थित होते. अमेरिकेने भारताला प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा दिल्या आहेत. भारत आणि अमेरिका यांच्यातलं सहकार्य वृद्धिंगत करण्यास अमेरिका उत्सुक आहे, असं अमेरिकेचे परराष्ट्र व्यवहार मंत्री मार्क रुबियो यांनी म्हटलं आहे. चीनमध्ये शांघाय इथं भारताचे कौन्सिल जनरल प्रतीक माथुर यांच्या हस्ते ध्वजारोहण झालं. भारतीय समुदायाचे लोक या कार्यक्रमाला उपस्थित होते.

राज्यपाल

प्रजासत्ताक दिनानिमित्त राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी राज्यातल्या नागरिकांना संबोधित केलं. महाराष्ट्र थेट परकीय गुंतवणुकीत देशात आघाडीवर असून

जागतिक गुंतवणूकदारांसाठी एक विश्वसनीय केंद्र म्हणून पुढे आला आहे, असं त्यांनी नमूद केलं. राज्यानं एक हजार अब्ज डॉलरची अर्थव्यवस्था बनण्याचं महत्त्वाकांक्षी ध्येय निश्चित केलं असून पायाभूत सुविधा आणि डिजिटल क्षेत्रात महाराष्ट्र देशाला दिशा देत असल्याचं राज्यपाल म्हणाले. राज्याची संत परंपरा आणि समृद्ध सांस्कृतिक वारशाचा उल्लेखही त्यांनी आपल्या संबोधनातून केला. महाराष्ट्र हे देशाच्या आर्थिक वाढीचं शक्तिशाली इंजिन असल्याचं ते म्हणाले. राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या योगदानाप्रती त्यांनी कृतज्ञताही व्यक्त केली. राजकीय स्वातंत्र्यासोबतच सामाजिक आणि आर्थिक न्याय मिळवून देणं हेच राज्यघटनेचं उद्दिष्ट असल्याचं ते म्हणाले.

ध्वजारोहण राज्य

महाराष्ट्रात आज प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहानं साजरा होत आहे. यानिमित्तानं राज्यभरात शासकीय कार्यालयं, शाळा, महाविद्यालयं, गृहनिर्माण सोसायट्या, तसंच सामाजिक संस्थांच्या वतीनं ध्वजवंदनासह अनेक कार्यक्रमांचं आयोजन केलं आहे. प्रजासत्ताक दिनाचा राज्याचा मुख्य सोहळा मुंबईत दादर इथल्या शिवाजी पार्क मैदानात पार पडला. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते ध्वजवंदन झालं. विधानपरिषदेचे सभापती राम शिंदे, मुंबईचे पालक मंत्री मंगल प्रभात लोढा, राज्याचे मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्यासह पोलीस अधिकारी, मान्यवर आणि नागरिक या सोहळ्याला उपस्थित होते. यावेळी मुख्यमत्र्यांनी राज्यातल्या जनतेला संबोधित केलं. राज्यघटनेतील स्वातंत्र्य, समता आणि बंधुतेच्या मूल्यांमुळेच देश वेगाने प्रगती करत असल्याचं त्यांनी नमूद केलं.

*देशाच्या विकासाचं इंजिन म्हणून आपला महाराष्ट्र अतिशय चांगल्या पद्धतीने काम करतोय आणि नुकतच दावोस येथे जे काही वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम झालं, त्या ठिकाणी महाराष्ट्राने तीस लाख कोटी रुपयाची गुंतवणूक त्याचे करार संपन्न केले आणि महाराष्ट्र थांबणार नाही, तो पुढेच जात राहील अशा पद्धतीने महाराष्ट्राची वाटचाल अधोरेखित केली.*

सरकार शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी वचनबद्ध आहे, नदीजोड प्रकल्पाद्वारे महाराष्ट्र दुष्काळमुक्त केला जाईल, असं आश्वासन मुख्यमंत्र्यांनी दिलं. सौर कृषी वाहिनी आणि सौर पंपांच्या बाबतीत महाराष्ट्र जगात आघाडीवर असल्याचं त्यांनी

सांगितलं. लाडकी बहीण योजना, मोफत वीज आणि प्रधानमंत्री आवास योजनेच्या माध्यमातून समाजातील प्रत्येक घटकाचा विकास केला जात असल्याचं ते म्हणाले. महाराष्ट्र भारताच्या अर्थव्यवस्थेचा कणा बनेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

ध्वजारोहण/विदर्भ

भारताच्या **77** व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त भंडारा येथे मुख्य ध्वजारोहण माजी पालकमंत्री संजय सावकारे यांच्या हस्ते पार पडलं. भंडाऱ्याच्या पोलिस मुख्यालयातील मैदानात पोलीस दल आणि सुरक्षा दलाच्या वतीने तिरंग्याला मानवंदना देण्यात आली. यवतमाळ येथील समता मैदानावर पालकमंत्री संजय राठोड यांच्या हस्ते ध्वजारोहण संपन्न झालं. गोंदिया जिल्ह्याचे पालकमंत्री इंद्रणिल नाईक यांच्या हस्ते गोंदिया शहरातील कारंजा परेड ग्राऊंड वर **77** व्या प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून ध्वजरोहन सोहळा पार पडला. चंद्रपूर येथे ध्वजारोहणाचा मुख्य शासकीय कार्यक्रम  आदिवासी विकास तथा पालकमंत्री, डॉ अशोक उईके यांच्या हस्ते संपन्न झाला. यावेळी जिल्ह्यातील सर्व वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. बुलढाणा जिल्ह्यात ध्वजारोहण जिल्हाधिकारी डॉ किरण पाटील यांच्या हस्ते  संपन्न झालं. तर पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्या हस्ते वर्ध्यात ध्वजारोहणाचा मुख्य कार्यक्रम पार पडला. त्याचप्रमाणे वाशीमचे पालकमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या हस्ते वाशीममध्ये मुख्य शासकीय ध्वजारोहण उत्साहात संपन्न झाला. प्रजासत्ताक दिनाचा मुख्य कार्यक्रम गडचिरोली इथं पोलिस मुख्यालयाच्या पटांगणावर पार पडला. राज्याचे वित्त,नियोजन व कृषी राज्यमंत्री तथा जिल्ह्याचे सहपालकमंत्री आशिष जयस्वाल यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले.

चंद्रशेखर बावनकुळे /ध्वजारोहण/सरकारी कार्यालय

नागपूर जिल्ह्यात सर्वच क्षेत्रात विविध विकासकामे सुरू आहेत. **2028** पर्यंतचा जिल्ह्याच्या समग्र विकासाचा आराखडा आपण दृष्टीपथात ठेवलेला आहे. महानगरासह ग्रामीण भागाच्या विकासाला सर्वोच्च प्राधान्यक्रम आहे. याअनुषंगाने शासनाच्या प्रत्येक अधिकारी-कर्मचा-यांनी जनतेचा सेवक या नात्याने आपली जबाबदारी पार पाडावी, असं प्रतिपादन पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केलं. कस्तुरचंद पार्क मैदानावर आयोजित प्रजासत्ताक दिनाच्या मुख्य शासकीय

कार्यक्रमात ते बोलत होते. खासदार श्यामकुमार बर्वे, प्रधान सचिव विनिता वेद सिंगल, विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी, पोलीस आयुक्त डॉ. रविंद्र कुमार सिंगल, आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते. जिल्ह्यातील सावनेर हे गाव आता सुरक्षा कवच असलेले गाव म्हणून नावारुपास आले आहे असंही ते म्हणाले.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ

नागपूर इथल्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या मुख्यालयांमध्ये प्रजासत्ताक दिनानिमित्त राष्ट्रध्वज फडकवला गेला. महाल परिसरातील संघ मुख्यालयात महानगर संघचालक राजेश लोया यांनी तर रेशीमबाग येथील डॉ.हेडगेवार स्मृती मंदिर परिसरात संघाच्या अखिल भारतीय सेवा प्रमुख पराग अभ्यंकर यांनी झेंडा वंदन केले.

ई-गव्हर्नन्स सुधारणा

राज्य सरकारच्या दीडशे दिवसांच्या ई गव्हर्नन्स सुधारणा उपक्रमा अंतर्गत नऊ सरकारी कार्यालयांनी उत्कृष्ट कामगिरी केल्याचं जाहीर करण्यात आलं आहे. भारतीय गुणवत्ता परिषदेच्या मूल्यांकानुसार या कार्यालयांची निवड झाल्याचं मुख्यमंत्र्यांच्या कार्यालयाने दिलेल्या निवेदनात म्हटलं आहे. यात , नागपूर विभागीय आयुक्त कार्यालयासह जळगाव जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे ग्रामीण पोलीस अधीक्षक कार्यालय, पनवेल महानगरपालिका, नाशिक पोलीस आयुक्त कार्यालय आणि नांदेड पोलीस महानिरीक्षक कार्यालयांचा समावेश आहे. त्याचप्रमाणे तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र सागरी मंडळ आणि सार्वजनिक बांधकाम विभाग या कार्यालयांचाही यात समावेश आहे.

हवामान

विदर्भात आज गोंदिया जिल्ह्यात **11.9°c** इतक्या किमान तापमानाची नोंद करण्यात आली. गोंदिया पाठोपाठ नागपुर इथं **12.6** तर वर्धा इथं **13.6** अंश सेल्सिअस इतक्या किमान तापमानाची नोंद करण्यात आली. सलग काही दिवस तापमानात वाढ होत असताना, आज पुन्हा एकदा किमान तापमानात घट नोंदवण्यात आली आहे. आज अकोला इथं **31.8** इतकं कमाल तापमान नोंदवण्यात आलं.

*****